## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

"ई-निविदा सुचना "

यांत्रिकी विभाग

जा.क्र: नांवाशमनपा/यांत्रिकी विभाग/3899/२०२५ दिनांक:- 18/06/2025

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड सर्व कंपनी /अधिकृत विक्रेता / इत्यादींकडुन महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागातील विविध कामे करण्यासाठी ०१ Utility वाहन खरेदी करण्याकरीता ई-निविदा मागविण्यात येत आहेत. ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन खरेदी करता येतील व भरता येतील. निविदेच्या अटी व शर्ती महानगरपालिकेच्या www.nwcmc.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

ई-निविदा वेळापत्रक

| अ.क्र. | तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | ई-निविदा प्रकाशीत करणे | 19/06/2025 | १५.०० |
| २ | ई-निविदा डाऊनलोड करणे | 19/06/2025 | १५.०० |
| ३ | निविदा भरणे | 19/06/2025 | १५.०० |
| ४ | निविदा भरण्याचा अंतिम दिनांक व वेळ | 03/07/2025 | १५.०० |
| ५ | ई-निविदा उघडणे | 04/07/2025 | १५.०० |

| अ क्र | वाहने व मशिनरीजचा प्रकार | Quantity | इसारा रक्कम रुपये | कोऱ्या निविदेची किंमत रुपये | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १. | **Supplying Vehicle of 01** Utility Vehicle (Bolero NEO PLUS) **for NANDED WAGHALA CITY MUNCIPAL CORPORATION** | Per Vehicle ०१ | १६,५००/- | ५९०/- | ०७ दिवस |

टिप.

कोणतेही कारण न देता ई-निविदा अंशत:/पुर्णत: मंजुर किंवा नामंजूर करण्याचा अंतीम अधिकार मा. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी राखुन ठेवला आहे. तसेच ई-निविदा पोर्टलवर बिडलॉक झाल्यानंतर निविदा बाबत कागदपत्रांच्या हार्डकॉपी एका प्रतीत निविदाधारकाने दि. रोजी १५.०० वाजेपर्यत उपअभियंता (यांत्रिकी) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांचेकडे सादर करावे.

अतिरिक्त आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :**

- मा. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाईस्तव :**

- जनसंपर्क अधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
- सूचना फलक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
- संगणक विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना देवुन कळविण्यात येते की, सदर ई-निविदा सुचना महानगरपालिका संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.
- संपादक दै.पुढारी (विभागीय 2) दै. प्रजावाणी यांना देवुन कळविण्यात येते की, वरील प्रमाणे दरपत्रक सुचना आपल्या वर्तमानपत्रात दिनांक 19/06/25 रोजीच्या अंकात 8X12 चौ.सेमी या आकारात प्रसिध्द करुन देयक व वृत्तपत्राच्या दोन प्रती शासनाच्या मंजुर दरासह अदाईस्तव महानगरपालिका कार्यालयात सादर कराव्यात.

अतिरिक्त आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

### ई-निविदा सुचना

जा.क्र/.नांवाशमनपा/यांत्रिकी वि/ 3899 /२०२५ दिनांक- 18/06/2025

कामाचे नाव :- नांदेड वाघाळा महानगरपालिकेसाठी एक Bolero NEO PLUS (Utility Vehicle) वाहन खरेदी बाबत.

दरपत्रक धारकाचे नाव :------------------------------------------------------------------

पत्ता :- ------------------------------------------------------------------

दुरध्वनी/भ्रमणध्वनी :- ------------------------------------------------------------------

**Technical Specification.**

| | Model No | Bolero NEO PLUS Utility Vehicle | Total Quantity |
|---|---|---|---|
| 1. | Max Power | 120 bhp @ 4000 rpm | 01 |
| 2. | Torque | 280 Nm @ 1800-2800 rpm | |
| 3. | Emission Standard | BS6 Phase 2 | |
| 4. | Transmission | Manual 6 gears. | |
| 5. | Air Conditioner | Yes (Manual) | |
| 6. | Seating Capacity | 9 | |
| Total Amount In Rs. With GST. (with Figures And Words) | | | |

**निविदेकरीता नियम व अटी :**

- निविदा सादर करण्याची कार्यपद्धत:

- निविदा दोन लिफाफा पद्धतीने सादर करावयाची असून तांत्रिक लिफाफा मधील माहितीच्या आधारे पात्र ठरणाऱ्या निविदाधारकांचा व्यापारी लिफाफा उघडण्यात येईल.

१. कोरी निविदेची किंमत व इसारा रक्कम Payment गेट वे व्दारे Online भरणा केल्याची पावतीची प्रत.

२. फर्म/ उत्पादन युनिटचे नोंदणी प्रमाणपत्र.

३. मागील तीन वर्षाचा ITR ची प्रत.

४. पॅन कार्ड (निविदा धारक यांचे स्वतःचे किंवा संस्थेचे)

५. वस्तु व सेवा कर कायद्याखालील नोंदणी प्रमाणपत्र.

६. निविदेसोबत सादर करण्यात येणाऱ्या कागद पत्रांच्या सत्यतेबाबत रु. १०० च्या मुद्रांक शुल्काच्या पेपर वर निविदेतील कामाचे नाव व निविदा क्रमांक टाकून नोटरी केलेले (स्वंयघोषणा पत्र) शपथपत्र.

७. निविदा धारक यांना किंवा निविदा सादर करणाऱ्या संस्थेला काळ्या यादीत टाकले नसल्याबाबत निविदा धारक यांचे स्वतःचे किंवा संस्थेचे लेटरपॅडवर घोषणापत्र देणे बंधनकारक राहील. प्रस्तावित निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याचे निविदा धारक यांचे स्वतःचे किंवा संस्थेचे लेटरपॅडवर घोषणापत्र देणे बंधनकारक राहील.

८. ज्या कंत्राटदाराची निविदा मंजूर झाली त्या निविदाधारकास सुरक्षा अनामत रक्कम दरपत्रकाच्या २% CDR किंवा FDR च्या स्वरुपात मा. आयुक्त, नांवाशमनपा, नांदेड यांच्या नावे महानगरपालिका फंडात जमा करणे बंधनकारक राहील.

**२. व्यापारी लिफाफा :** व्यापारी लिफाफ्यात केवळ निविदेत नमूद केल्याप्रमाणे दर सादर करावे.

**निविदेच्या इतर अटी व शर्ती**

१. निविदाधारकांनी http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरुन निविदा भरावी.

२. निविदा धारकांनी मशिनरीजचे एका वर्षाची विमा उतरुन देणे बंधनकारक राहील.

३. निविदाधारकांनी सर्व दर हे पूर्ण रुपयामध्ये सर्व करासह भरावे. सर्व वाहने/मशिनरी ही प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या नियमा नुसार पुरवठा करावे.

४. निविदाधारकांनी स्वत:चे Digital Signature असने आवश्यक आहे.

५. निविदा धारकांने निविदा मंजुर झाल्यानंतर मशिन पुरवठ्याच्या ठिकाणापासुन नांवाशमनपा नांदेड ला पर्यंत वाहन/ मशिन पुरवठा करण्याची जबाबदारी निविदाधारकाची असेल.

६. निविदाधारकाच्या देयकातुन नियमानुसार आयकर व त्यावरील अतिरिक्त कर, वस्तु व सेवा कर कायद्याखालील कपात करण्यात येईल.

७. यशस्वी निविदा धारकास या कार्यालयाकडुन कोणतेही शासकीय/ निमशासकीय कराची रक्कम देण्यात येणार नाही. त्या बाबतच्या माफीचे कोणतेही प्रमाणपत्र देण्यात येणार नाही

८. देयके सादर करतांना GST ची नोंद असलेली देयकेच सादर करणे आवश्यक राहील.

९. निविदाधारकास कार्यारंभ आदेश दिल्यापासुन ०७ दिवसाच्या आत वाहन पुरवठा न केल्यास रु. १,००० प्रति दिवस याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

१०. वाहनाचे देयक हे महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थीती व निधी उपलबद्धतेनुसार अदा करण्यात येईल. देयक अदा करण्यास विलंब झाल्यास कोणत्याही प्रकारचे व्याज अदा केल्या जाणार नाही.

११. यशस्वी निविदाधारकास पुरवठ्याच्या तारखेपासुन १२ महिन्यांपर्यंत मशिनची देखभाल, दुरुस्तीची वॉरटी द्यावी लागेल.

१२. निविदाधारकाने मशिनरीजचे तांत्रिक तपशील देणे.

१३. निविदाधारकाने कोणतीही सुचना/अट समाविष्ठ केल्यास ती निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

१४. वरीलपैकी कोणत्याही अटी अथवा शर्तीमधील संपुर्ण अथवा कोणत्याही भागाचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीतठेकेदाराविरुध्द नियमानुसार व भारतीय दंड संहिता IPC मधील उचित कलमानुसार कार्यवाही केली जाईल. तसेच निविदा धारकास दंड आकारण्याचे अधिकार मा.आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना असतील.

१५. सदर निविदेसंदर्भातील कोणताही न्यायालयीन खटला नांदेड जिल्हा न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात चालविला जाईल.

१६. कोणत्याही अटीच्या अर्थाबद्दल किंवा इतर कोणत्याही बाबतीत विवाद उद्भवल्यास मा.आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांचा निर्णय अंतीम व बंधनकारक राहील.

१७. सदरची निविदा अगर निविदेतील कोणताही भाग तसेच कोणत्याही अटी व शर्तीमध्ये कोणतीही पुर्व सुचना न देता रद्द करणेचा /राखुन ठेवणेचा तसेच सुधारणा करण्याचा हक्क मा.आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी राखुन ठेवला आहे.

१८. निविदा स्विकारणे अथवा नाकारणे याबाबीचे सर्व अधिकार मा.आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी राखुन ठेवले आहे.

| | | |
|---|---|---|
| शहर अभियंता | अतिरिक्त आयुक्त | |
| नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | दरपत्रक धारकाची स्वाक्षरी |